जागतिक मातृभाषा
दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
मातृभाषेचे संवर्धन
मातृभाषेचे जतन
जागतिक
मातृभाषा दिन

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५

## थोडक्यात

### नवी मुंबईत 'डिस्नेलँड'च्या धर्तीवर थीम पार्क

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** मिकी माऊस, मिनी माऊस, डोनाल्ड डक, गुफी अशा कार्टूनमधील आपल्या आवडत्या पात्रांना भेटण्याची आणि विविध थरारक राईड्सचा अनुभव घेण्याची संधी लवकरच मुंबई, नवी मुंबईतील लहानग्यांना उपलब्ध होणार आहे. कारण नवी मुंबईत २०० हेक्टर जागेवर 'डिस्नेलँड'च्या धर्तीवर 'थीम पार्क' साकारण्यात येणार आहे. 'मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) ग्रोथ हब'च्या अंतिम आराखड्यात हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

देशाच्या आर्थिक विकासवाढीसाठी 'निती' आयोगाच्या शिफारशीनुसार, 'एमएमआर ग्रोथ हब' प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाची जबाबदारी असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) 'एमएमआर ग्रोथ हब'चा अंतिम आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार, 'एमएमआर'चा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र म्हणून विकास करताना अनेकविध प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. त्या प्रकल्पाअंतर्गत औद्योगिक, पर्यटन, शिक्षण, पायाभूत सुविधा, गृहनिर्माण, आरोग्य, बंदर विकास अशा अनेकविध क्षेत्रांचा विकास केला जाणार आहे. त्यानुसार 'एमएमआर'ला आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून ओळख निर्माण करून देण्यासाठी या आराखड्यात अनेक प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. अलिबागचा विकास जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून करण्यापासून ते मुंबई, 'एमएमआर'मधील किल्ल्यांच्या संवर्धनाचा समावेश पर्यटन केंद्रात असणार आहे. तर राज्याप्रमाणेच देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी 'मुंबई आय'सह नवी मुंबईत 'डिस्नेलँड'च्या धर्तीवर जागतिक दर्जाचे 'थीम पार्क'ही प्रस्तावित करण्यात आले आहे.

### तरुणीचा जीबीएस सिंड्रोममुळे मृत्यू

**दि.२०, बारामती :** बारामतीतील किरण राजेंद्र देशमुख या २६ वर्षीय युवतीचा 'जीबीएस सिंड्रोम ' या आजारामुळे मंगळवारी (ता. १८ रोजी)मृत्यू झाला. गेल्या काही दिवसापासून तिची या आजारावर उपचार चालू होते. ती या आजाराची झुंज देत होती. मात्र तिचे हे प्रयत्न अपयशीच ठरले.

किरण देशमुख ही पुण्यात सिंहगड परिसरामध्ये शिक्षणाच्या निमित्ताने त्यांच्या जवळच्या नातेवाईकान कडे राहत होती, त्याच दरम्यान तिला जीबीएस या आजाराची लागण झाली होती. किरणच्या पार्थिवावर मंगळवारी रात्री उशिरा बारामती येथील जळोची या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले.

तिच्या निधनामुळे या परिसरामध्ये शोककळा पसरली होती, गेल्या काही महिन्यापासून पुण्यातील परिसरामध्ये जीबीएस सिंड्रोम चे रुग्ण वाढीस लागत आहेत. किरण राहत असलेल्या परिसरामध्येही काही रुग्ण आढळल्याचे त्यांच्या नातेवाईकांकडून समजले.

# अहिल्यानगरमधील साखर कारखान्यांनी ४३४ कोटींची 'एफआरपी' थकवली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील सहकारी १३ सहकारी व खासगी ९ अशा एकुण २२ साखर कारखान्यांनी आतापर्यंत ८९ लाख ३७ हजार मे. टन ऊसाचे गाळप केले आहे. तर ७७ लाख ४४ हजार ६४३ क्विंटल साखरपोत्यांचे उत्पादन केले आहे. गाळप सुरू होऊन तीन महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही अगस्ती, अशोक, वृद्धेश्वर, केदारेश्वर यासह ७ कारखान्यांना ऊस उत्पादकांची ५० टक्क्यांपेक्षाही कमी एफआरपी थकवली आहे. कर्मवीर काळे, मुळा, सहकारमहर्षी थोरात व साईकृपा या चारच कारखान्यांनी १०० टक्के 'एफआरपी' अदा केली आहे.



यंदाच्या गाळप हंगामास ऊसाची कमतरता भासेल असे वाटप असतांना हंगाम जोमाने सुरू आहे. या सर्व २२ कारखान्यांकडून १ हजार ८९८ कोटी ७७ लाख ९२ हजार एफआरपी रकमेचे वाटप होणे आवश्यक असतांना १ हजार ४६४ कोटी ३३ लाख ९ हजार रुपयांच्या एफआरपीचे वाटप झाले आहे. ४३४ कोटी ४४ लाख ८३ हजारांची एफआरपी रक्कम थकवली आहे. सर्वात कमी केदारेश्वर कारखान्याने अवघी २५.०८ टक्के एफआरपीचे वाटप केले, साजन शुगरनेही २५.८६ टक्के, श्री स्वामी समर्थ कारखान्याने २८.०८ टक्के एफआरपीचे वाटप केले आहे. वृद्धेश्वर कारखान्याने ३५.६२ टक्के, गजाजन कारखान्याने ४६.६८ टक्के, अशोकने ४५.९० टक्के, अगस्तीने ४९.५० टक्के, डॉ. विखे पाटील कारखान्याने ५०.०८ टक्के एफआरपीचे वाटप केले आहे.

ऊसाचे गाळप झाल्यानंतर १४ दिवसांत शेतकर्‍यांना एफआरपीची रक्कम अदा होणे आवश्यक असतांनाही केवळ चार कारखान्यांकडून १०० टक्के एफआरपीची रक्कम अदा झाली आहे. उर्वरित ८ कारखान्यांकडून ५० टक्केपेक्षाही कमी एफआरपीचे वाटप केले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. साईकृपाने ११९.७९ टक्के तर थोरात कारखान्याने ११५ टक्के म्हणजे शंभर टक्क्यांपेक्षाही जास्त एफआरपी रक्कमचे वाटप केले आहे.

मुळा व काळे कारखान्याने शंभर टक्के वाटप केले आहे. अन्य कारखान्यामध्ये ज्ञानेश्वरने ७५.५७ टक्के, गणेश ८९.५३ टक्के, नागवडे ८३.६८ टक्के, कोल्हे ८२.५७, इंडियन ६५.७३, जयश्रीराम ६३.६४, क्रांतीशुगर ६६.८०, धुमाळ ९३.५६ टक्के एफआरपीचे वाटप केले आहे.

काही साखर कारखान्यांनी एफआरपी अदा केली आहे. पण ती करतांना केवळ विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांची पीक कर्जाची रक्कम जमा केली आहे. मात्र शेतकर्‍यांची उर्वरित रक्कम काही त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली नसल्याचे समजले. सेवा सोसायट्यांची शंभर टक्के वसुली दाखवितांना शेतकर्‍यांच्या बँक खात्यामध्ये मात्र अजूनही एफआरपीची रक्कम जमा झालेली नाही. १५ डिसेंबरपर्यंत शेतकर्‍यांना पैसे मिळाले आहेत. त्यानंतर दोन महिने झाले तरी अद्यापही शेतकर्‍यांची बँक खाती रिकामीच आहेत. सोसायट्यांच्या वसुलीसाठी पीक कर्जाची रक्कम कारखान्यांनी लगेच जमा केली. पण शेतकर्‍यांना अजूनही ताटकळत ठेवले आहे.

# भारतासाठी 'चॅम्पियन ट्रॉफी' २०२५ ची विजयी सुरुवात !

## मोहम्मद शमीचा अनोखा रेकॉर्ड ! शुभमन गीलची शतकी खेळी...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, दुबई :** शुबमन गिलचं शतक, केएल राहुलचा विजयी षटकार आणि मोहम्मद शमीचे ५ विकेट्स यासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पहिल्याच सामन्यात बांगलादेशवर ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या. तर भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना ६ विकेट्सने आणि २१ चेंडू शिल्लक ठेवत जबरदस्त विजयाची नोंद केली. शुबमन गिल, मोहम्मद शमी हे भारताच्या विजयाचे हिरो ठरले.









शुबमन गिल पहिल्यांदाच आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळत आहे आणि या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावत आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. सलामीसाठी उतरलेला गिल भारताला विजय मिळवून देतच माघारी परतला. गिलने १२९ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद १०१ धावा केल्या. उपकर्णधार असलेल्या शुबमन गिलने भारताच्या डावाची जबाबदारी घेत विजय मिळवून दिला.

तर मोहम्मद शमीने मोठ्या कालावधीनंतर भारतीय संघात पुनरागमन केले. पण आयसीसीने टूर्नामेंटमध्ये पाऊल ठेवताच शमीचा तोच वादळी फॉर्म पुन्हा पाहायला मिळाला. शमीने बांगलादेशच्या डावात ५ विकेट्स घेत आपल्या भेदक गोलंदाजीचा प्रत्यय दाखवून दिला. शमीने १० षटकांत ५३ धावा देत ५ विकेट्स घेतले.

बांगलादेशने दिलेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी रोहित शर्मा आणि शुबमन गिलची जोडी मैदानात उतरली. रोहित शर्मा झटपट खेळी करत ७ चौकारांसह ४१ धावा करत बाद झाला. तर विराट कोहली २२ धावा, श्रेयस अय्यर १५ धावा, अक्षर पटेल ८ धावा करत बाद झाले. विराट, श्रेयस आणि अक्षरचे लागोपाठ विकेट गेल्यानंतर भारतीय संघ आता पेचात अडकतो की काय, अशी स्थिती निर्माण झाली. पण नंतर आलेल्या केएल राहुलने गिलबरोबर संघाचा डाव सावरत विजयाकडे नेले.

केएल राहुलचा एक सोपा झेल सोडल्यानंतर राहुलने गियर बदलत गिलबरोबर वेगवान खेळी केली. राहुलने ४७ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह ४१ धावा केल्या. तर शुबमन गिल शतकी खेळी करत नाबाद माघारी परतला. बांगलादेशकडून रिशाद हुसैनने २ तर मुस्तफिजूर आणि तस्किन यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णयही बांगलादेशसाठी योग्य ठरला नाही. बांगलादेशच्या संघाने ५ विकेट्स गमावत फक्त ३ धावा केल्या होत्या. पहिल्या आणि दुसऱ्या षटकात सलग २ विकेट गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीचा निर्णय चुकीचा ठरल्याचे दिसून आले. ९व्या षटकापर्यंत, संघाने केवळ ३५ धावांमध्ये ५ विकेट गमावल्या होत्या, त्यापैकी शमीने २ विकेट घेतल्या होत्या. ९व्या षटकात अक्षर पटेलने लागोपाठ २ विकेट घेतल्या मात्र रोहित शर्मानेे जकीर अलीचा झेल सोडल्याने अक्षर हॅटट्रिक घेऊ शकला नाही.

रोहितच्या कॅच ड्रॉपचा फटका टीम इंडियाला बसला. जकीर अलीने तौहीद हृदयसह सहाव्या विकेटसाठी १५४ धावांची शानदार भागीदारी करत संघाटा डाव सावरला. यादरम्यान हार्दिक पंड्यानेही झेल सोडत तौहीदला दिलासा दिला. त्यावेळी तो केवळ २३ धावांवर खेळत होता. पण दोन्ही फलंदाजांनी याचा फायदा घेतला आणि या शानदार भागीदारीसह त्यांनी संघाला स्पर्धात्मक स्थितीत आणले. जकीरला बाद करून शमीने एकदिवसीय क्रिकेटमधील २०० विकेट पूर्ण केले.

तर तौहीदने एकदिवसीय क्रिकेटमधील पहिले शतक पूर्ण करून तो दिवस संस्मरणीय बनवला. मात्र, शमीने शेवटच्या फलंदाजांना जास्त काळ टिकू दिले नाही आणि ५ विकेट घेत बांगलादेशचा डाव २२८ धावांवर आटोपला. भारताकडून शमीने ५, हर्षित राणाने ३, अक्षर पटेलने २ विकेट घेतले. भारताचा आता पुढील सामना रविवारी २३ फेब्रुवारीला पकिस्तानविरूद्ध होईल.

# धक्कादायक! बारावीच्या परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना नेऊ दिले मोबाईल

**दि.२०, नागपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षांना मंगळवार ११ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. नागपूर विभागातून १ लाख ५८ हजार ५३७ विद्यार्थी ५०४ केंद्रांवरही परीक्षा सुरू आहे.परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी महसूल विभागाच्या मदतीने यंदा प्रत्येक परीक्षा केंद्रावर यावेळी भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे प्रत्येक केंद्रावर होणाऱ्या परीक्षेतील गैरप्रकारावर यंदा शिक्षण मंडळाची नजर आहे.

परंतु, नागपुरातील एका परीक्षा केंद्राबाहेर गुरुवारी काही पालकांनी गोंधळ घातला. परीक्षा केंद्रामध्ये काही विद्यार्थ्यांना भ्रमनध्वनी घेऊन जाताना पकडण्यात आल्याचा दावा पालकांनी केला.

काही विद्यार्थ्यांना भ्रमनध्वनी नेण्यास सुविधा देण्यात आली असा आरोप पालकांचा आहे. त्यामुळे परीक्षेच्या सुरक्षेवरून प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे विभागीय शिक्षण मंडळाने असा कुठलाही प्रकार घडणे शक्यच नाही असा दावा केला आहे. अशी कुठलीही तक्रार असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करून परीक्षा केंद्रच बंद केले जाईल, अशी माहिती दिली.

तीन दिवसांपूर्वी गोंदिया जिल्ह्यामध्येही परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप झाला होता.



गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथील एका परीक्षा केंद्रावर बारावी भौतिकशास्त्राचा पेपर बाहेर आला असून सर्व प्रश्न उत्तरांची छायांकित प्रत बाहेर आली आहे. बारावी परीक्षेदरम्यान केंद्रावर सर्रास कॉपी सुरू असल्याचा प्रकार सोमवारी उघडकीस आला. या प्रकारामुळे कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडाल्याचे चित्र आहे. शिक्षण विभागाला या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

बारावी विज्ञान शाखेचा भौतिकशास्त्राचा पेपर होता. शहरातील एका केंद्रावर त्याच शाळेतील एक विद्यार्थी बारावीचा पेपर देत असताना त्याला हा प्रकार आढळून आला. त्याने नाव न सांगण्याच्या अटीवर केंद्रावर मिळालेली छायांकित प्रत दिली. छायांकित कॉपीवर एकूण नऊ प्रश्नांची उत्तरे लिहिलेली आढळली. यावरून प्रश्नसंच बाहेर गेलाच कसा व त्याची उत्तरे सोडवून छायांकित प्रत केंद्रावर आली कशी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अक्षराज

२ बुलडाणा, शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५ विविधा

# संपादकीय



## भारतीय संघाला शुभेच्छा!

जगातील आठ सर्वोत्तम संघात खेळली जाणारी क्रिकेटची चॅम्पियन ट्रॉफी अर्थात मिनी वर्ल्डकप स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई येथे १९ फेब्रुवारी पासून सुरू झाली असून या स्पर्धेतील पहिला सामना यजमान पाकिस्तान व न्युझीलंड या दोन देशात पार पडला. या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना काल म्हणजे २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशशी दुबईत झाला. हा लेख तुमच्या हाती पडेपर्यंत या सामन्याचा निकाल लागलेला असेल. भारताचा दुसरा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी रविवारी अर्थात २३ फेब्रुवारी रोजी दुबईत होईल. केवळ भारत पाकिस्तानमधील क्रिकेट रसिकांचेच नव्हे तर जगभरातील क्रिकेट रसिकांचे लक्ष या सामन्याकडे लागले आहे. भारत पाकिस्तान हा हाय व्होल्टेज सामना दुबईत रंगणार असून नेहमीप्राणेच हा सामना अटीतटीचा होईल यात वाद नाही. भारताचा न्युझीलंडशी १२ मार्च रोजी मुकाबला होईल. भारताच्या गटात बांगलादेश, पाकिस्तान आणि न्युझीलंड हे देश आहेत. यातील भारत पाकिस्तान आणि न्युझीलंड हे तिन्ही देश या स्पर्धेतील माजी तसेच संभाव्य विजेते म्हणूनही गणले जातात त्यामुळेच या ग्रुपला ग्रुप ऑफ डेथ असे म्हंटले जाते. भारताला उपांत्य फेरी गाठायची असेल तर किमान दोन सामने जिंकावे लागतील ते ही चांगल्या धावगतीने कारण ग्रुप मधील तीन संघाने जर प्रत्येकी दोन विजय मिळवले तर ज्यांची धावगती चांगली आहे अशाच दोन संघाला उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल. भारताला खरा धोका आहे तो पाकिस्तान आणि न्युझीलंड या दोन देशांशी कारण हे दोन्ही देश धोकेदायक समजले जातात. अलीकडच्या काळात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले असले तरी मागील म्हणजे २०१७ च्या चॅम्पियन ट्रॉफी मधील अंतिम सामन्यात पाकिस्ताननेच भारताला नमवले होते हे विसरून चालणार नाही. न्युझीलंड हा आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत कायम भारताला जड गेलेला देश आहे. आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत न्यूझीलंडचा भारताविरुद्धचा रेकॉर्ड चांगला आहे म्हणून भारताने या दोन्ही देशांशी खेळताना सतर्क राहायला हवे. जर भारताने या दोन देशांना नमवले तर भारत उपांत्य फेरीत पोहचेल. भारत उपांत्य फेरीत पोहचला तर अंतिम फेरीत नक्की पोहचेल इतकेच नाही तर भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव देखील कोरेल असा विश्वास अनेक दिग्गज आजी माजी क्रिकेटपटुंना आहे त्याचे कारणही तसेच आहे भारतीय संघ सध्या फॉर्मात आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताने एकतर्फी विजय मिळवत इंग्लंडला व्हाईट वॉश दिला. विशेष म्हणजे या मालिकेत भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने इंग्लंड विरुद्ध शतक झळकावून फॉर्मात आल्याचे दाखवून दिले. ऐन चॅम्पियन ट्रॉफीच्या तोंडावर रोहित शर्मा फॉर्मात आला हे भारतासाठी शुभचीन्ह आहे. रोहित शर्मा फॉर्मात असला की तो भारताला एकहाती विजय मिळवून देतो. रोहित शर्मा सोबतच भारताचा मॅच विनर आणि जगातील सर्वोत्तम फलंदाज विराट कोहली हा देखील फॉर्ममध्ये आला आहे. हे दोघे भारताचे जय विरू आहेत. हे दोघे फॉर्मात येणे म्हणजे भारताचे निम्मे काम फत्ते होणे. या दोघांना शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि के एल राहुल यांची साथ मिळेल. यातील गिल आणि श्रेयस हे दोघेही फॉर्मात आहेत. राहुलने मोठी खेळी केली नसली तरी मोठ्या स्पर्धेत तो आपला खेळ उंचावतो. हार्दिक पांड्या आणि रविंद्र जडेजा हे भारतचे अष्टपैलू खेळाडू फलंदाजी आणि गोलंदाजीत कमाल करू शकतात तसेच त्यांचे क्षेत्ररक्षण ही उत्तम आहे. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल हे फिरकीची तर मोहंमद शमी आणि अर्षदीप सिंग हे वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतील. जसप्रीत बुम्राची उणीव जाणवणार असली तरी शमी आणि अर्षदीप आपल्या वेगवान गोलंदाजीने प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणतील यात वाद नाही. भारताप्रमाणेच ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान या संघाकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिले जात असले तरी भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात बलाढ्य संघ आहे. जर भारताच्या खेळाडूंनी त्यांच्या क्षमतेनुसार खेळ केला तर २०१३ नंतर प्रथमच भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरेल आणि १४४ कोटी देशवासीयांना जल्लोष करण्याची संधी मिळवून देईल यात शंका नाही.

**भारतीय संघाला चॅम्पियन ट्रॉफीसाठी मनापासून शुभेच्छा!**

# शिवजन्मोत्सव का साजरा होतो??

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो. अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. सन २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स.१६७४मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३० रोजी छ.शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि.१९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्म तारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध




तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुन:स्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे शिक्षण, परकीय सत्तेविरूद्ध लढा देण्यात आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

शिवरायांची राजमुद्रा: छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी- प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते! त्याचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल. बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील. महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते. शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स.१६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले.

शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू दि.३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला, असे सांगितले जाते.

**!! शिवजयंती निमित्ताने शिव छत्रपतींना मानाचा मुजरा व सर्वांना प्रेरणादायी शिवमय हार्दिक शुभेच्छा!!**

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरुजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

## गुप्त बातमी..

जेवढी बातमी गुप्त
तेवढे अधिक पाय
सांगू नका कुणाला
हळू फैलावत जाय

पाहुणे वर्दळ वाढते
भरगच्च होई सराय
शिकवणारे अधीक
प्रत्येकजण देई राय

कसे लपवावे गुपीत
मुळीं मिळेना उपाय
उघडे होता ते सत्य
काय होणारं अपाय

रे कॅमेरे सताडउघडे
बोलतात हॅलो हाय
मोकळी होतात मने
रडतात मोकलूधाय

सिसी टिव्ही टपलेले
कुठे लपवलेयं काय
साळसूद बोके फिरे
टपलेत खायलासाय

उघडे होतात लफडे
देमाय न् धरणी ठाय
थांबतनाही गुपीत ते
का सांगितले शिवाये

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मनाई आदेश

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, ठाणे :** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना इत्यादीकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, उपोषणे इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे. दिनांक २३/०२/२०२५ रोजी संत गाडगे महाराज जयंती, दिनांक २६/०२/२०२५ रोजी महाशिवरात्री, स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी, दिनांक २७/०२/२०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिन, दिनांक ०२/०३/२०२५ रोजी रमजान रोजे समारंभ, दिनांक ०८/०३/२०२५ रोजी जागतिक महिलादिन/विर एकलव्य जयंती, असे सण / उत्सव संपन्न होणार आहेत. तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) दिनांक ११/०२/२०२५ ते दिनांक १८/०३/२०२५, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १०वी) दिनांक २१/०२/२०२५ ते दिनांक १७/०३/२०२५ व सीबीएससी १० वी परीक्षा दिनांक १५/०२/२०२५ ते दिनांक १८/०३/२०२५, सीबीएससी १२ वी परीक्षा १५/०२/२०२५ ते दिनांक ०४/०४/२०२५ या कालावधीत सुरू झालेल्या आहेत.

सदर घटनांच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्याकामी प्रतिबंधक आदेश जारी करणे आवश्यक आहे. त्या अन्वये ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात जिवीत व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खालील कृत्यांना मनाई आदेश देत आहे.

१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडूके, बंदुका, लाठया/काठया किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर वाहून नेणे, बाळगणे, जमा करणे व तयार करणे.

२ ) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.

३) कोणताही दाहक किंवा स्फोटक पदार्थ आणि द्रव बाळगणे, बरोबर नेणे.

४) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे इत्यादी.

५) कोणत्याही इसमाचे चित्राचे/प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे/प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे

६) सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल किंवा राज्यातील शांतता धोक्यात येईल किंवा ज्यामुळे राज्यशासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक, प्रदर्शित करणे.

७) पाच किंवा पाचापेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्ये करण्यास मनाई केली जात आहे,

नागरिकांनी सहकार्य करावे असे मीना मकवाना, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर, यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# संविधान जगण्याची चौकट आणि समानतेचं प्रतीक - चंद्रकांत पाटील

**दि.२०, मुंबई :** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचे मोठे अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. संविधान ही जीवन जगण्याची चौकट आहे. भारतीय संविधान बदलले जात असल्याचा चुकीचा प्रचार केला जात आहे. महिलांना विधानसभा व लोकसभेत ३३ टक्के आरक्षण, सर्वाना मोफत शिक्षण, विद्यार्थ्यांना आर्थिक निकषांवर नोकरीत आरक्षण अशा तरतुदी करण्यात आल्या. भारतीय संविधान हा एक जिवंत दस्तऐवज असून तो वाचून समजून घेणे महत्वाचे आहे. आपल्या अधिकार आणि कर्तव्याची जाणीव संविधानामुळे होत असून सामाजिक, आर्थिक जीवन जगण्याचा मार्ग संविधानामुळे मिळत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना मतदानाचा समान अधिकार दिला त्याबद्दल आपण सदैव त्यांच्या ऋणात राहू, असेही मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले. मुंबई विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर, दोन वसतीगृहे आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र जाहीर केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांचे आभार मानले. विद्यापीठामार्फत लवकरच या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला जाणार असल्याचे सांगून भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त मुंबई विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांत विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचेही प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचे सचिव अमित यादव यांनी आपल्या उदबोधनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

३ बुलडाणा, शुक्रवार, दि.२१ फेब्रुवारी २०२५ संमिश्र

# थोडक्यात

## मुंबईतील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, मुंबई :** वरळीच्या एनएससीआय डोम सेंटरमध्ये दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईतील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करून आगामी आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. गेल्या अडीच वर्षात सरकारने मुंबई आणि राज्यात केलेली कामे जनतेपर्यंत पोहचवा. प्रत्येक वॉर्डात शिवसेनेच्या शाखा आणि घर तिथे शिवसैनिक झाला पाहिजे, अशा सूचना यावेळी शिंदे साहेबांनी शिवसैनिकांना केल्या. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर शिवसेना आता महापालिका निवडणुकीसाठी सज्ज असून त्यासाठी अगदी जोशाने कामाला लागण्याचे आवाहन यावेळी केले. सर्व पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद देत महापालिका निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळविण्यासाठी संकल्प केला. यावेळी उबाठा गटाचे विलेपार्ले उपविभागप्रमुख जितेंद्र जनावळे, युवती सेनेच्या अजिता जनावळे, उपविभागप्रमुख अनिल खांडेकर, हनी सबलो, शरद पवार गटाचे मुंबई सचिव सतीश नायर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या बैठकीला शिवसेना नेते रामदास कदम, विधानसभेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार रवींद्र वायकर, आमदार प्रा. मनीषा कायंदे, शिवसेना सचिव सिद्धेश कदम आणि शिवसेनेचे सर्व खासदार, आमदार, नेते, उपनेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंचूर शहरात विविध ठिकाणी शिवजयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील भवानी पेठा मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आश्वारुढ पुताळ्याला सकाळी जोडप्यांसह अभिषेक व पुष्पहार अर्पण करुण शिवजयंती उत्साहाला सुरुवात करण्यात आली. शिवजयंती उत्सानिमित्त विंचूर येथील शिवभक्ताकडून आदल्या रात्री १२ वाजता मोठ्या प्रमाणात आताषबाजी करण्यात आली. तसेच गावातील लहान विद्यार्थी मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर संध्याकाळी संपूर्ण शहरामधून भव्यदिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीने अवघ्या गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. यावेळेस विंचूर लासलगाव पोलीस स्थानकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे व गावातील सर्व शिवभक्त, राजकीय नेते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. विंचूर येथील भवानी पेठ मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतीपथावर असून, शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विंचूर येथे लहानग्या कडूनही शिवभक्तांकडून शिवजयंती उत्सव साजर करण्यात आला. विंचूर येथील ब्राह्मण गल्ली येथे लहानग्या चिमुकल्यांनी एकत्र येत पहिल्यांदाच शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. शिवाजी महाराजांची मूर्ती ठेवून पाठीमागे डेकोरेशन करण्यात आले व ढोल वाजून शिवजयंती चिमुकल्या शिवभक्तांनी मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी परिसरातील मोठ्या नागरिकांनी लहान मुलांचे कौतुक केले. मुलांना शिवाजी महाराजांच्या जीवनातील मूल्ये कळावी असे प्रतिपादन येथील पालकांनी केले.

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, शिळफाटा (ठाणे) :** दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता दत्त मंदिर कल्याण फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती रथामध्ये बसवण्यात आली. त्यानंतर पूजा अर्चना करण्यात आली. महाआरती सुद्धा करण्यात आली. ढोल, ताशा आणि डीजी वाजवून बाईक रॅली काढण्यात आली. शिव तरुणांनी कुर्ता पायजमा परिधान करून डोक्यावर केसरी फेटा बांधला होता. कपाळावर चंद्रकोर कोर टिकली लावून पारंपारिक पोशाख परिधान करून शिवजयंतीच्या मिरवणूक सहभागी झाले होते. शिवप्रेमी तरुणी नऊवारी साडी, अंगावर शेला, नाकात नथ, कपाळावर चंद्रकोर टिकली, डोक्यावर केसरी फेटा बांधून पारंपारिक पोशाख परिधान करून लेझीम हातात घेऊन पारंपारिक नृत्य सादर केले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती शिळ-देसाई, दहिसर- कौसा विभाग कडून छत्रपती शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते.

बाईक रॅलीला सुरुवात दत्त मंदिर कल्याण फाटा येथून सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी, अशा घोषणा रॅलीमध्ये देण्यात आल्या. पडले, देसाई नाका, खिडकळी, डायघर नाका, गोठेघर, उत्तरशिव, भंडार्ली, मोकाशी पाडा, दहिसर मोरी, दहिसर नाका, पिंपरी, भारत गिअर्स, मुंब्रा बायपास ब्रिज, फडके रोड छत्रपती शिवाजी महाराज चौक खाडी, या सर्व विभागातून बाईक रॅली काढण्यात आली. या सर्व भागांमध्ये भगवे वादळ निर्माण झाले होते. शिळफाटा गणेश मंदिर येथे बाईक रॅलीचा समारोप करण्यात आला. आलेल्या मान्यवरांचे सत्कार समितीकडून करण्यात आले.

गणेश मंदिर येथे शिवप्रेमींसाठी भोजनाची ही व्यवस्था करण्यात आली होती. या सर्व विभागांमध्ये गावाच्या प्रत्येक चौकामध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. अनेक कार्यक्रम ठेवण्यात आले होते. मलगगडावरून शिवप्रेमींने पेटी मशाल हातात घेऊन धावत धावत देसाई विठ्ठल रुक्माई च्या मंदिरापर्यंत घेऊन आले. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, भजन, लेझीम, असे अनेक कार्यक्रम शिवप्रेमींनी आपल्या भागामध्ये ठेवले होते. हा कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पडण्यासाठी सर्व शिव प्रेमींनी आणि भक्तांनी मोलाची मेहनत घेतली.

## ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी; कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२०, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने होणाऱ्या ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी आज जाहीर करण्यात आली. मनमाड, नाशिक येथील गुरु गोविंदसिंह हायस्कूल शेजारील हॅलीपॅड मैदानावर दिनांक २३फेब्रुवारी २०२५ पासून या स्पर्धेला प्रारंभ होईल.

मॅटच्या ४ क्रीडांगणावर सकाळ व सायंकाळ अशा दोन्ही सत्रात हे सामने खेळविले जातील. प्रथम किशोरी (मुलींचे) गटाचे सामने होतील. मुलींची छाननी दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं.०३ नंतर घेण्यात येईल. मुलींच्या स्पर्धेला दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०८.३०वा. सुरुवात होईल. त्यानंतर मुलांची स्पर्धा घेण्यात येईल.

**जाहीर करण्यात आलेली गटवारी खालील प्रमाणे -**

किशोरी गट:- अ गट:-१)जालना, २)सिंधुदुर्ग, ३)मुंबई उपनगर पूर्व.

ब गट:- १)नाशिक शहर, २)उस्मानाबाद, ३)नाशिक ग्रामीण, ४)औरंगाबाद.

क गट:- १)ठाणे शहर, २)मुंबई उपनगर पश्चिम, ३)जळगाव, ४)हिंगोली.

ड गट:- १)परभणी, २)रत्नागिरी, ३)ठाणे ग्रामीण, ४)बीड.

इ गट:- १)पिंपरी चिंचवड, २)कोल्हापूर, ३)पालघर, ४)धुळे.

फ गट:- १)सांगली, २)पुणे ग्रामीण, ३)सोलापूर, ४)लातूर.

ग गट:- १)सातारा, २)नंदुरबार, ३)रायगड, ४)नांदेड.

ह गट:- १)मुंबई शहर पश्चिम, २)पुणे शहर, ३)अहमदनगर, ४)मुंबई शहर पूर्व.

**किशोर गट :-** अ गट:- १)पिंपरी चिंचवड, २)अहमदनगर, ३)मुंबई शहर पश्चिम.

ब गट :- १)नंदुरबार, २)नाशिक शहर, ३)जळगांव, ४)सिंधुदुर्ग.

क गट:- १)बीड, २)पुणे शहर, ३)कोल्हापूर, ४)सोलापूर.

ड गट :- १)पुणे ग्रामीण, २)सांगली, ३)उस्मानाबाद, ४)मुंबई शहर पश्चिम.

इ गट :- १)रायगड, २) रत्नागिरी, ३)ठाणे ग्रामीण, ४)मुंबई शहर पूर्व.

फ गट :- १)परभणी, २) औरंगाबाद, ३)नाशिक ग्रामीण, ४)सातारा.

ग गट :- १)हिंगोली, २) मुंबई उपनगर पूर्व, ३)नांदेड, ४) जालना.

ह गट :- १)पालघर, २)मुंबई उपनगर पश्चिम, ३)लातूर, ४) ठाणे शहर.

## पंतप्रधान आवास योजनेतून महाराष्ट्रात २० लाख घरे बांधली जाणार - एकनाथ शिंदे

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२०, मुंबई :** सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत. त्याचे जीवनमान उंचावले पाहिजे,तसेच सर्वांचे घरांचे स्वप्न देखील पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी २१ हजार ३९९ नागरिकांना सिडकोचे 'माझ्या पसंतीचे सिडको घर' याद्वारे हे स्वप्न पूर्ण होत असल्याने हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असून त्यांच्या अभिनंदनाची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाईन सोडत काढण्यात आली. यावेळी शिंदे म्हणाले की, सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वांत मोठी लॉटरी असून यात नागरिकांना आपली पसंद नोंदविण्याची मुभा फक्त सिडकोने दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घरे देण्याची घोषणा केली असून एवढ्या मोठ्या प्रमाणात घरे देण्याचा विक्रम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सिडकोची ही घरे टाटा, एल.एण्ड टी., शापूरची यांच्या सहभागाने बांधली असल्याने ती अतिशय दर्जेदार असून घरे रेल्वे स्टेशन्स, विमानतळाच्या जवळ असल्याने सामान्यांना त्याचा फायदा होणार आहे.

नवी मुंबईचे अतिशय वेगाने शहरीकरण होत असल्याने घरांची मागणी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.पूर्वी नवी मुंबईतून मुंबईत येण्यासाठी एक ते दीड तास लागत असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, आता अटल सेतूमुळे २० मिनिटात प्रवास होतो. आता ठाणे ते विमानतळ एक डेडीकेटेड कॉरिडोर करण्यात येणार असून त्याचबरोबर मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या अर्थसंकल्पात देशात तीन कोटी घरे देण्याचे जाहीर केले असल्याने महाराष्ट्रात २० ते २५ लाख घरे नक्की बांधली जाणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मुंबईतून बाहेर गेलेल्या मुंबईकरांना मुंबईत परत आणण्यासाठी गृहनिर्माणाच्या नवनवीन योजना आणल्या जात आहे. त्याचबरोबर सिडको, एमएमआरडीएम, एमएसआरडीसी, महाप्रित, बीएमसी, म्हाडा, एसआरए या सर्व संस्थांना एकत्र करून रखडलेले प्रकल्प लवकर सुरू करण्यात येत असल्याचेही त्यांनी जाहिर केले. समुह विकास माध्यमातून सर्वांना खुली जागा, खेळाची मैदाने, शाळा, वैद्यकीय सुविधा मिळणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान या प्रकल्पाबाबत बोलतांना उपमुख्यमंत्री म्हणाले की, काही एनजीओ, पर्यावरणवाद्यांनी या प्रकल्पास विरोध दर्शवून या प्रकल्पामुळे फ्लेमिंगो पक्षी नवी मुंबईतून कमी होतील, असे सांगितले होते. मात्र त्यावेळी रिमुव्हर्स सर्कुलेशन ड्रेन, नॉईस बॅरिअर या तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोची संख्या कमी न होता आणखी वाढली. यावरून हे शासन प्रो इन्व्हायरमेंट प्रकल्प करते आहे, हे दिसून आले. आता नवीन गृहनिर्माण धोरण आणली जात असून यात सर्वांसाठी परवडणारी घरे, परवडणारी भाड्याची घरे, विद्यार्थी वसतीगृहे, काम करणाऱ्या महिलांसाठी घरे, ज्येष्ठ नागरिकांना घरे, गिरणी कामगार, डबेवाले आदींचा यात अंतर्भाव असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## पुण्यात जीबीएसचा कहर सुरूच एकूण मृतांची संख्या ११ वर

### जीबीएस उद्रेकानंतर पालिकेची तपासणी मोहीम

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२०, खडकवासला (पुणे) :** पुण्यासह राज्यभरात 'जीबीएस' चा कहर सुरूच आहे. पुण्यात रुग्णसंख्या कमी झाली असली तरी बाधित रुग्णांच्या मृत्यूची संख्या ही वाढतच आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये दौंड येथील ३७ वर्षीय तरुण व सिंहगड रस्त्यावरील नांदेड सिटी येथे राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीच 'जीबीएस' चे उपचार घेत असताना मृत्यू झाला.त्यामुळेआतापर्यंत एकूण मृतांची संख्या ११ झाली आहे. आतापर्यंत पुण्यात 'जीबीएस' च्या रुग्णांची संख्या २११ वर पोहोचली आहे.

जीबीएसचा प्रादुर्भाव वाढत असून या पार्श्वभूमीवर शहरातील पाण्याची तपासणी करण्यात आली. या तपासणीत कोणते घटक आढळले आणि त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतो, याबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. जाणून घेऊया या अहवालातील मुख्य निष्कर्ष. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून जीबीएस ने थैमान घातलं आहे.

राज्यभरात जीबीएस बाधित रुग्ण सापडत असून पुण्यात मात्र रुग्णांचे सर्वाधिक प्रमाण आहे. त्यामुळे पुणे महापालिकेने सिंहगड रस्ता परिसरात पाणी तपासणी मोहीम हाती घेतली. या परिसरातील पाण्याचे नमुने विविध ठिकाणी पाठवण्यात आले आणि या तपासणी अहवालात धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठ्यासह खासगी टँकर आणि आरओ प्रकल्पांचे पाणीसुद्धा पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आलं आहे. सिंहगड रस्ता परिसरातील पाण्याच्या ७० नमुन्यांमध्ये आरोग्यास घातक असे जीवाणू आणि विषाणू आढळले आहेत. राज्यात अनेक जीबीएस बाधित हे पुण्यातून प्रवास करून आले आणि नंतर त्यांना आजार झाला असे निदर्शनास आले. त्यामुळे सध्या पुण्याचे पाणी हे आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरतंय.




## शासनाने होमगार्डना वर्षभर कर्तव्यावर घेऊन पगार देण्याची मागणी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, कुंडलवाडी (नांदेड) :** कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोलिसांना मदत करण्यासाठी नेहमी तत्पर असलेले होमगार्ड गेल्या ७८ वर्षापासून पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. पण वर्षातील दोन ते अडीच महिने देशसेवा आणि दहा महिने मजुरी किंवा मिळेल ते काम करण्यासाठी या होमगार्डच्या तरुणावर वेळ येत आहे. त्यामुळे या होमगार्डच्या कामाचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी आता होऊ लागलेली आहे.

देशाचे तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी मुंबईत जातीय दंगली उसळल्यानंतर होमगार्ड संघटनेची स्थापना केली. राज्यात होमगार्ड संघटनेच्या स्थापनेला ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी होमगार्ड पदार्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पण त्यांच्या समस्या अजूनही सुटलेल्या नाहीत. तर होमगार्ड पोलिसाच्या खांद्याला खांदा लावून काम करत असतात. नैसर्गिक आपत्ती कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नेहमीचं तत्पर असतात. पण त्यांच्या हाताला फक्त वर्षातले २ महिने सरकारी काम असतं. आणि १० महिने रोजंदारीची काम करावी लागतात.

नवरात्रीची १० दिवस, गणेश उत्सवातील ११ दिवस, ६ डिसेंबरचे जवळपास ४ दिवसांची काम पोळ्याला ४ दिवस, बोर्ड परीक्षेच्या वेळेला १५दिवस आणि ऐन वेळी २ दिवस अशी होमगार्ड ची ड्युटी लागते. यावेळी सरकारकडून एवढीच अपेक्षा आहे की, यांना ३६५ दिवस काम मिळावं जेणेकरून यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवता आला पाहिजे. काम न मिळाल्यामुळे उपासमारीची वेळ यांच्या कुटुंबावर आलेली आहे.

सरकार माय बापाला एवढीच विनंती आहे की, यांना ३६५ दिवस काम मिळावं. २०१९ मध्ये शासनाने होमगार्डना वर्षातील १८०दिवस काम देण्याचा निर्णय घेतला होता. पण सरकार बदलल्याने पुढे काही झालं नाही. पण सरकारने १२८३ रुपये भत्ता देण्याचा निर्णय घेतला. पण होमगार्डच्या हाताला वर्षातील ३६५ दिवस काम देण्याची मागणी होत आहे. सरकारकडून मिळणाऱ्या भत्त्यावर घर प्रपंच चालत नाही. घर प्रपंच चालवण्यासाठी वर्षातील १० महिने होमगार्ड इतर रोजंदारी मिळवण्यासाठी मजुरी किंवा ऑटो रिक्षा चालवणे किंवा भाजीपाले किंवा फळांचा गाडा लावणे इत्यादी कामे करतात.

वर्षातून दोन महिने काम आल्यानंतर इतर महिन्यांमध्ये काय काम करायचं त्यामुळे घर भागत नसल्याने काही होमगार्ड इतर व्यवसाय करत आहेत. व घरच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. राज्यात कायदा व इतर सुव्यवस्था राखण्यासाठी होमगार्डची मदत घेतल्या जाते. पण हे होमगार्ड ७८ वर्षापासून सन्मान आणि चांगल्या कामासाठी झटत आहेत. त्यांना योग्य सन्मान देऊन कायमस्वरूपी काम मिळणार का? ते बघावं लागेल.

# पारनेरच्या जनतेला वेठीस धरू नका - मनसे नेते अविनाश पवार

## जनतेला गृहीत धरून वेठीस धरत असाल तर आपले परतीचे तिकिट काढून ठेवा - पवार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२१, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तहसील कार्यालयात सर्व सामान्य गोर गरीब शेतकरी बांधवांची रस्ता केस संदर्भात अव्हेलना होत आहे. सर्व सामान्य शेतकरी माणसाला गृहीत धरून हे महसुल कर्मचारी उडवा उडविची उत्तरं देत असल्यानं कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. हे दुर्दैवी आहे. पारनेर तालुक्यातील राजकीय अराजकतेचा अधिकारी यांनी गैर फायदा घेतला असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माथाडी कामगार सेना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

शेतकरी, शालेय विद्यार्थानसह नागरिकांच्या तक्रारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे प्राप्त झाल्यानंतर रितसर पत्रव्यवहार करुन एक महिला अधिकारी म्हणून सन्मान देत संयमाने घेत आज उद्या काम काजात बदल होईल. अशी अपेक्षा असताना दोन अडीच वर्षे पूर्ण झाली तरीही तहसील कार्यालयात काहीही बदल होत नाही तहसील कार्यालयातील कर्मचारी नागरिकांना उडवा उडवीची उत्तरे देतात कर्मचारी उपस्थित असताना सुद्धां आज आले नाही. बाहेर आहे अशा प्रकारे स्वतः तोच कर्मचारी उत्तर देतो हे घृणास्पद आहे. तहसील कर्मचाऱ्यांना गळ्यात आयडी कार्ड घालणं बंधनकारक असताना सुद्धां घालत नाहीत. सर्व सामान्य माणसाला किरकोळ कामासाठी हेलपाटे मारावे लागतात.

रेशनकार्ड, नाव समाविष्ट नोंदणी, दुबार, ऑनलाईन करण्यासाठी, विभक्त करण्यासाठी, नविन रेशनकार्ड काढण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. तसेच सेतू केंद्राच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर खुलेआम नागरिकांची, शालेय विद्यार्थीची विविध प्रकारचे दाखले काढण्यासाठी लुट होत असताना पत्र व्यवहार करुन सुद्धां कोणत्याही प्रकारची कारवाई होताना दिसत नाही. तसेच सेतू केंद्राच्या नावाने बोगस सेतू सुविधा केंद्र थाटली आहेत. सेतू केंद्रात माहिती सनद लावणं बंधनकारक असताना सुद्धा कोणत्याही केंद्रात याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे अव्वाची सव्वा रुपये घेऊन गरीबांना लुटलं जात आहे. पारनेर तालुक्यात तहसीलच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गौण खनिज उत्खनन केले जाते आहे. खुलेआम महसुल बुडवून लाखो रुपयांची उलाढाल होत असताना तहसीलदार यांना लेखी पुराव्यानिशी तक्रार दाखल करुन सुद्धां कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. त्यामुळे पारनेर तहसील कार्यालय अवैध व्यवसाय करणाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम करत असल्याने संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. पारनेर तालुक्यात गोरं गरिबांना स्वस्त धान्य दुकानदार धान्य देत नाही. कोठा कमी असल्याने काही करु शकत नाही उत्तरं देत आहे आणि रेशनिंगचा काळाबाजार होत असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निदर्शनास आणून दिले असताना सुद्धां कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. याचा अर्थ काय...महसुल प्रशासन निशक्रिय झाले आहे की, महसुल प्रशासनाच्या कृपा आशिर्वादाने हा अवैंध गोरख धंदा जोरदार चालू आहे. याबाबत लवकरच जिल्हा अधिकारी अहिल्या-नगर यांची भेट घेणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

# माझी मातृभाषा माझा अभिमान!

भारतीय भाषांची जननी संस्कृत भाषा आहे.इ.स.पूर्व तिसऱ्या व चौथ्या शतकात संस्कृत ही बोलीभाषा होती. कालांतराने आर्य- अनार्यांच्या संपर्कातून भाषिक संक्रमण घडून आले.भाषा धर्मियांची आक्रमणे चौथ्या शतकापर्यंत निर्माण झाले.हे भाषिक समूह अखंड हिंदुस्तानाच्या भिन्न भिन्न भौगोलिक क्षेत्रात वास्तव्य करू लागले. इ.स. ५ ते ८ या काळात भिन्न भिन्न भाषकांच्या संदेशनातून विविध भाषिक समूह निर्माण झाले. यांच्यातून त्यांची समिश्र भाषा तयार झाली. सोयीप्रमाणे त्याचा वापर होऊ लागला त्यामुळे भाषेचा अपभ्रंश झाला. त्याला अपभ्रंश भाषा असेही म्हटले जाते. आशिया खंडातील सध्याच्या भारत खंडात हे भाषिक समूह वास्तव्य करू लागले. शौरशेनी, पैशाची,मागधी, आणि महाराष्ट्री असे अपभ्रंश भाषेचे चार प्रकार निर्माण झाले. मध्य भारत खंडात राहणाऱ्या आर्य- अनार्य या भाषिक समूहांनी संदेश वहनासाठी महाराष्ट्रीयन या अपभ्रंश भाषेचा स्वीकार केला. कालांतराने नवव्या शतकात मराठी बोली अस्तित्वात आली. त्यावरून मराठी भाषेची उत्पत्ती इसवी सन नवव्या शतकात झाली असे म्हणता येईल. भिन्न भिन्न भाषिक समूह ती बोली स्वीकारतो. बोली रूपात असलेली भाषा कालांतराने ग्रंथरूप धारण करते. त्यातून नव्या भाषेचा जन्म होतो. भाषिक समूह कालांतराने ती भाषा स्वीकारतो व आठव्या- नवव्या शतकात माझी म हाराष्ट्री अर्थात मराठी कायमची स्थिरावली. ननव्या व दहाव्या शतकात यादवांनी मराठी भाषेचा स्वीकार केला आणि बाराव्या शतकात त्यांनी ग्रंथरूप धारण केले. मुकुंदराजाचा विवेकसिंधू हा मराठीतील सण ११८७ ते ८८ मधील पहिला मराठी ग्रंथ. या काळात संत वाययाच्या बरोबरीने महानुभव पंथांचा ग्रंथ लीळाचरित्रही उपलब्ध आहे

महाराष्ट्र या भौगोलिक प्रदेशातील लोक समुहाची संदेशवहनाची भाषा मराठी आहे. महाराष्ट्र देशी ये जनः निवासती ते महाराष्ट्र असं म्हटले जाते. आठव्या शतकात मरहट्ट लोकांचे वास्तव्य होते. यांच्या मराठी बोलीभाषेने कालांतराने मराठी रूप धारण केले. यादवांच्या कालखंडातील ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सर्वार्थाने महत्त्वाचा आहे. भगवतगीतेवरील टीका ग्रंथ असलेला ज्ञानेश्वरी हा मराठीतील अलौकिक ग्रंथ आहे. ज्ञानदेवांनी म राठी भाषेबद्दल, माझा मराठीची बोलू कौतुके । अमृता तेही पैजा जिंके । असे गौरव उद्गार काढले. मराठी भाषेवर संत ज्ञानेश्वरांचे असणारे उत्कट प्रेम होते.याच काळात संत नामदेव संत मुक्ताबाई इतर संत गोळा गोतावळा गोरा कुंभार,संत नरहरी सोनार, सावता माळी,सेना न्हावी,संत चोखामेळा, कान्होपात्रा या इतर संतांनी अभंगवाणीने मराठी भाषा अजून समृद्ध केली. मराठी भाषेचे गद्य वायय सुद्धा अधिक महत्वाचे आहे.

मराठी भाषेच्या उत्पत्तीसाठी व विकासासाठी काही लिखित साधने व ऐतिहासिक साधने साहाय्यभूत ठरले. लिखित साधनांपैकी प्रथम ग्रंथरचना. या ग्रंथरचनेमुळे मराठी भाषेचे सौंदर्य अजूनही वाढत गेले कारण संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरीने सर्व जगभर भक्ती व अध्यात्म यांचे महत्त्व सांगितले. संशोधक यांच्या मते ज्ञानेश्वरी हा विज्ञानवादी ग्रंथ आहे कारण यामध्ये अनेक वैज्ञानिक सिद्धांत पाहावयास मिळतात. खगोल,भूगोल याविषयी सविस्तर माहिती दिसून येते.महानुभाव पंथांचा लिळाचरित्र समानतेची शिकवणूक देणारा आहे.त्यानंतरच्या काळात संत एकनाथ यांचे एकनाथी भागवत, संत तुकोबा यांची गाथा,यामुळे मराठी भाषा अजूनच होत राहिली ते आजतागायत. मराठी भाषेच्या संत साहित्याने मराठी भाषेचे महत्त्व उत्तरोत्तर वाढवले आहे. आज मराठी भाषेतील हजारो पुस्तके संत साहितत्यावर आधारित आहे. त्याबरोबर सर्व महाराष्ट्रभर मायबोली राज्यभाषा म्हणून ओळखली जाते. शासकीय कार्यालयाबरोबर शालेय स्तरावर प्रथम भाषा म्हणून मराठीची ओळख आहे. मराठी भाषा विकासासाठी दुसरे सहाय्यभूत साधन म्हणजे ताम्रपट. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्याही अगोदर इसवी सन १०६० मधील हा ताम्रपट मराठीतील आद्य लेख असून त्यावर मराठी भाषेतील शब्द आढळून येतात. ताम्रपटातून मराठी भाषेचे प्राचीनत्व स्पष्ट होते.या काळात मराठीला देशीभाषा म्हणूनही ओळखल्या जात होते.कारण महाराष्ट्र निर्मितीच्या अगोदर महाराष्ट्र राज्यांच्या आजूबाजूंची इतर राज्य जसे की,कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, दक्षिणेत तमिळनाडू, छत्तीसगड वगैरे या राज्यांमध्ये सुद्धा देशीभाषेतील ताम्रपट आढळतात. मराठी भाषेच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरलेली साधने म्हणजे शिलालेख. शिलालेख म्हणजे दगडावर कोरलेले लेखन. दगड हा साधारण कुठेही उपलब्ध होत असल्यामुळे ताम्रपटापेक्षा शिलालेखावरील लिखाण हे विश्वासार्ह आहे. याचे उदाहरण म्हणजे संत ज्ञानेश्वर ज्या कामाला टेकून बसले होते. तो खांब म्हणजेच नैवासाचा शिलालेख संत ज्ञानेश्वर यांच्या ५१ वर्ष अगोदचा आहे.त्या खांबाजवळील जुनाट अश्या हेमाडपंथी देवळाच्या दगडावरील हा लेख आहे. ज्ञानेश्वरी पूर्वी १७ वर्ष अगोदर असलेला हा पंढरपूरच्या चौरश्यांचा शिलालेख यावर विठ्ठल मंदिर बांधण्यासाठी वर्गणी देणाऱ्यांची नावे आहे. त्याचबरोबर पाटण शिलालेख,परळचा शिलालेख, पळसदेवचा शिलालेख,आंबेगावचा शिलालेख असे मराठी भाषेतील शिलालेख उपलब्ध आहे व त्यातून मायबोली मराठीचे महत्त्व समजून येते.मराठी भाषेच्या विकासास असणारे सहाय्यभूत लिखित साहित्यांपैकी चौथे साधन म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्य हे समाज जीवनाचा आरसा असतो कारण, समाजात अनेक पिढ्यांपासून चालत आलेल्या आणि जन माणसात रुजलेल्या कथा,कहाण्या, गीते,उखाणे,अख्यायिका अशा विविध प्रकारातून समाजचित्र प्रतिबिंबित होत असते. लोकसाहित्य स्वाभाविक अशा व्यवहाराच्या बोली भाषेतून व्यक्त होत असते. तेराव्या शतकातील काही स्त्रियांची गाणी, उखाणे, म्हणी प्रसिद्ध आहेत.तसेच लिळाचरित्रातील चक्रधरांनी धनाई नावाच्या छोट्या मुलीला सांगितलेल्या कावळा-चिमणीच्या गोष्टी नोंद दिसून येते.त्यानंतर सोळाव्या शतकात मराठी च्या प्रमाण भाषेतील दासबोध ग्रंथ, मनाचे-श्लोक व शिवकालामध्ये काही परमेश्वराची, देवी तुळजाभवानीचे गुण, गाताना दिसून येते.त्यानंतर पेशवे काळात पेशव्यांच्या बखरी दिसून येतात. स्वातंत्र्याअगोदर व स्वातंत्र्यानंतर मराठी कादंबऱ्या,कवितासंग्रह, लेखसंग्रह आपणास दिसून येतात,अर्थात लोकसाहित्याने म राठी भाषेला समृद्ध केले व मराठी भाषेचा झपाट्याने विकास झाला. म्हणून माझ्या मराठी भाषेचा मला अभिमान आहे कारण,मराठी भाषा अजूनही उत्तरोत्तर प्रगती करत आहे. मराठी भाषेच्या उत्पत्ती काळातील सहाय्यभूत साधनांपैकी ऐतिहासिक साधनांची सुद्धा महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.त्यापैकी महत्वाचे म्हणजे राजकीय स्थित्यंतरे व सांस्कृतिक साधने. या काळात मराठी भाषेला विशेष महत्त्व होते म्हणून त्या काळात अनेक ग्रंथांची निर्मिती झाली.त्याचबरोबर मराठीचे संवर्धन करण्यास मदत झाली.संस्कृतीची जोपासना सुद्धा झाली. शिवकाल हा मराठी भाषेच्या विकासाचा काळ होता, कारण या काळात भारतीय संस्कृती व महाराष्ट्र संस्कृतीची जोपासना व सण उत्सवाचे महत्त्व समजून सांगण्यासाठी छत्रपती शिवरायांनी सर्वो तोपरी प्रयत्न केले. संत तुकोबाराय यांचे अभंग त्याचबरोबर संत रामदास यांचा महाराष्ट्र धर्म वाढवावा यासारखे विचार हा मराठी भाषेच्या उन्नतीचा काळ ठरला व त्यातून मराठी भाषेचा विकास झाला. या घडामोडीबरोबर संपूर्ण भारताबरोबर महाराष्ट्रावर अनेक संकटे आली तरी मराठी भाषा सदैव अभंग राहिली.भलेही भौगोलिक वास्तव्यानुसार व प्रदेशानुसार शब्दांचा अपभ्रंश होऊन भौगोलिक क्षेत्रांचा विचार केल्यास मुंबई, कोकण, उत्तर महाराष्ट्र,पश्चिम महाराष्ट्र,मराठवाडा व विदर्भ या सर्व क्षेत्रातील बोलीभाषा भिन्न-भिन्न असल्यातरी माय मराठीने या सर्व बोलीभाषांना एकवटून ठेवले आहे. त्यामुळे मराठी माणूस सुद्धा एकजूट आहे म्हणून माझ्या मराठी भाषेचा मला अभिमान वाटतो. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५३ मध्ये आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती झाली. त्याअनुषंगाने राज्या-राज्यामध्ये भाषिक वाद निर्माण झाले म्हणून,तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली भाषा आयोगाची स्थापना केली.भाषा आयोगाने भाषा या घटकाला मध्यवर्ती ठेवून संपूर्ण भारतातील राज्यांची भाषिक माहिती संकलित केली. या संकलित केलेल्या भाषिक माहितीच्या अभ्यासावरून वेगवेगळ्या भाषिक प्रदेशाची निर्मिती करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे भारत सरकारने १९५६ मध्ये सहा केंद्रशासित प्रदेश व १४ घटक राज्यांची निर्मिती केली.मात्र यातून भाषिक वाद मिटलाच नाही.यात मुख्यतः महाराष्ट्र, गुजरात,कर्नाटक या प्रदेशांच्या सीमारेषा ठरवितांना अडचणी निर्माण झाल्या. मुंबई हे शहर गुजरात मध्ये जोडण्यात येणार असा ठराव मंजूर झाल्यावर, मात्र संपूर्ण महाराष्ट्रभर वादळे पेटली त्यासाठी भाषा प्रेमींनी, नेतेमंडळींनी,राजकीय मंडळींनी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर उभी केली याचे परिणाम स्वरूप १ मे १९६० या दिवशी मुंबईसह महाराष्ट्र या स्वतंत्र राज्याला मान्यता दिली व महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी म्हणून घोषित केली. महाराष्ट्र निर्मिती अगोदर व नंतरही काही लोक उद्योग व्यवसाय व इतर कारणामुळे महाराष्ट्राच्या बाहेर गेलेले आहेत. ते लोक तेथेही कुटुंबामध्ये मराठी भाषेचाच वापर करतात.गुजरात,मध्य प्रदेश,उत्तर प्रदेश,आंध्र प्रदेश, तमिळनाडू कर्नाटक अशा राज्यांमध्ये मराठी भाषिक लोक गेलेले असले तरी,ते लोक मराठी भाषेचा वापर करताना प्रकर्षाने आढळून येतात. काही राज्यांमध्ये तर मराठी माध्यमांच्या शाळा तसेच महाविद्यालय व इतर विद्यापीठांमध्ये मराठी विभाग सुरू आहेत. इंदोर,भोपाल, बडोदा,दिल्ली व गोवा येथे मराठी सांस्कृतिक मंडळ आहेत ते मराठी संस्कृतीव भाषेचे संवर्धन करण्याचे कार्य करतात. या माझ्या मराठीने संपूर्ण भारतातील लोकांनाही एकजूट ठेवण्याचे कार्य केले. महाराष्ट्राचा भाषिक नकाशा तयार केल्यास त्या भौगोलिक क्षेत्रातील लोक,विवाह जात, परंपरा, संस्कृती,आचार-विचार,भाषिक देवाण-घेवाण रूढी, व्यवसाय इत्यादी घटकांशी संबंधित आहे. भौगोलिक क्षेत्राचा विचार केल्यास मुंबई,कोकण,उत्तर महाराष्ट्र पश्चिम, महाराष्ट्र मराठवाडा, विदर्भ या क्षेत्रानुसार बोलीभाषा जरी भिन्नभिन्न असल्या,विविधता आढळून येत असली तरी सर्व बोलींची नाळ मात्र माय मराठीशीच जुळलेली आहे.सुरेश भट ही त्यांच्या कवितेत म्हणतात, लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी अशी ही माय मराठी भाषा हीचा मला अभिमान वाटतो.

मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनातर्फे रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली समिती गठित करून ५०० पानांचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला होता. केंद्र सरकारने सर्व निकषानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचादर्जा दिला.अभिजात भाषेचे निकष लक्षात घेता,भाषेला दीड ते अडीच हजार वर्ष वय असावे. भाषेतील साहित्य श्रेष्ठ असावे.भाषेची ग्रंथ आणि इतर साहित्य परंपरा असावी.साहित्य मूळ भाषेतील असावे अनुवादीत नसावे. भाषेला स्वतःचे स्वयंभूषण असावे. त्याचबरोबर प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.अशा या सर्व निकषातूनही माझी माय मराठी सरस ठरली म्हणून, माझ्या मराठी भाषेचा मला सार्थ अभिमान आहे. दुसरे महत्त्वाचे असे की मराठी भाषेला अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी राज्य सरकारने ३ फेब्रुवारी २०२५ ला असा आदेश जारी केला की, सर्वच शासकीय,निम शासकीय कार्यालय,महानगरपालिका ते ग्रामपंचायत मध्ये मराठी बोलणे अनिवार्य असणार आहे. संगणकावरील छापील अक्षर कळमुद्रा ही मराठी भाषेत असावी. त्या अनुषंगाने येत्या २५ वर्षांमध्ये मराठी मराठी ही ज्ञानभाषा व रोजगाराची भाषाप्रस्थापित करणे ही शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तिसरे महत्त्वाचे असे की, ऑक्टोबर २०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर,सरहद्द पुणे आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासिका,लेखिका डॉ तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली देशाची राजधानी दिल्ली येथे २० ते २३ फेब्रुवारी २०२५ रोजी तालकठोरा स्टेडियम येथे आयोजित केले आहे ही आपल्या समस्त मराठी भाषकांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

आपल्या भारत देशावर तिसऱ्या व चौथा शतकापासून भिन्न भिन्न भाषा धर्मियांची आक्रमण झाली. ख्रिस्त, बुद्ध,मोहम्मद पैगंबर यांच्या आश्रयाने धर्मक्रांती घडून आली त्यातून भाषिक संक्रमण घडून आले. तरी सुद्धा संत, महात्मे यांनी धार्मिक ग्रंथांच्या रूपाने ज्येष्ठ साहित्यिकांच्या कादंबऱ्या, कविता,गझल व कथाकार यांनी हजारो पुस्तक व ग्रंथ साहित्याच्या माध्यमातून माय मराठीचे संगोपन व संवर्धन केले.देशभरच नाहीतर साता समुद्रपार माय मराठीची ख्याती पसरवली. म्हणून माझ्या माय म राठीचा व मराठी भाषिक असल्याचा मला सार्थ अभिमान आहे.

**मातृभाषा दिनाच्या समस्त मराठी भाषीकांना शुभेच्छा...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**

**मासरूळ जि.बुलडाणा**

**मो.९७६३२८२०७७**

# थोडक्यात

## भैरवनाथ चषक २०२५ चे पिंपरे बुद्रुक येथे आयोजन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि. २०, खंडाळा (सातारा) :** पिंपरे बुद्रुक ता.खंडाळा येथे भैरवनाथ क्रिकेट क्लब पिंपरे बुद्रुक आयोजित भैरवनाथ चषक २०२५ पर्व १ चे भव्य हापपिच नाईट क्रिकेट सर्कल सामने नुकतेच पार पडले. तीन दिवस चाललेल्या या सामन्यात राज इलेव्हन पिंपरे बुद्रुक यांनी प्रथम क्रमांक तर बुवासाहेब क्रिकेट क्लब सोनवलकर वस्ती यांनी द्वितीय क्रमांक, नीरा टायगर्स दगडे वस्ती यांनी तृतीय क्रमांक आणि फलटण इलेव्हन सस्तेवाडी यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. या भैरवनाथ चषक २०२५ साठी भीमराव धायगुडे, श्रीधर सोनवलकर, विक्रम धायगुडे,अविनाश धायगुडे, सुजित शिंदे आदी मान्यवरांनी बक्षीसाची रक्कम देत म दत केली. हे सामने योग्य रीतीने पार पाडण्यासाठी कमिटी म्हणून नितीन काकडे, कुंडलिक धायगुडे, किरण काकडे, अजित धायगुडे, राजेंद्र चौधरी, अनिकेत साळुंखे, पोपट धायगुडे, आदित्य चव्हाण, सुनील जाधव, धनंजय धायगुडे जयराज कांबळे, आकाश काकडे, अभिषेक काकडे, आप्पा डोईफोडे युवराज धायगुडे, प्रणव धायगुडे शिवतेज पवार, नितीन ननावरे यांनी मोलाचे सहकार्य केले. सामन्याचे उद्घाटन युवा नेते मिलिंद धायगुडे पाटील, पिंपरे बुद्रुक गावचे उपसरपंच अनिल धायगुडे, भारतीय जनता पार्टी सरचिटणीस श्रीधर सोनवलकर, नंदकुमार ऊर्फ काका चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्रीधर सोनवलकर सरचिटणीस भारतीय जनता पार्टी खंडाळा यांनी प्रतिपादन केले की येणाऱ्या काळात पिंपरे बुद्रुक मध्ये क्रिकेटचे यापेक्षाही मोठे भव्य दिव्य असे सामने भरवण्यात येतील. हे सामने अत्यंत योग्य पद्धतीने व सुनियोजित रीतीने पार पडल्याबद्दल आयोजकांचे व सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक आभार ही मानले.

## अतिट गावात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२०, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्यात अतिट गावांमध्ये छत्रपती शिवाजी बाल तरुण मंडळातील सर्व शिव भक्त व अतिट ग्रामस्थ यांचेवतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिव ज्योत ही किल्ले पुरंदर ते अतिट या गावापर्यंत मंडळातील सर्व शिव भक्तांनी ही शिव ज्योत आणली. तसेच राज्याभिषेक सोहळा देखील सुंदर पद्धतीने पार पडला.राज्याभिषेक सोहळा झाल्यानंतर सायंकाळी ढोल ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी राजांची भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये गावातील सर्व ग्रामस्थ महिला वर्ग तसेच गावातील सर्व मंडळातील शिव भक्त आणि भगिनी वर्ग तसेच लहान चिमुकली मुले मुली वेगवेगळी वेशभूषा करून मिरवणुकीत सहभागी झाले. मिरवणूक झाल्यानंतर अतिट गावच्या आदर्श सरपंच रुपाली अंकुश जाधव व सर्व मंडळातील सभासदांनी चांगल्या पद्धतीने भोजनाचे नियोजन केले होते. कार्यक्रमासाठी आकर्षक असे फेटे भाजपा सातारा जिल्हा उपाध्यक्ष संभाजी दादा जाधव पाटील यांच्याकडून देण्यात आले. जयंतीनिमित्त आयोजित भारूड व कलाकारांचा विशेष खर्च पुणेकर सहकारी यांनी केला. लोणंद परिसरातील मलवडी या गावातून आलेल्या भारुडातील सर्व कलाकारांनी चांगल्या पद्धतीचे जनजागृतीचे काम केले. दैनंदिन जीवनात जीवन जगत असताना मुलीच्या लग्नाबाबतच्या वाढत्या अपेक्षामुळे मुलांना वेगवेगळ्या स्वरूपात समस्या कशा पद्धतीने भेडसावत आहेत. हे पटवून देण्याचे काम यावेळी भारुडाच्या माध्यमातून सर्व कलाकार मंडळीकडून करण्यात आले.

## जव्हार शहरात राजेंना मानाचा मुजरा



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२०, जव्हार (पालघर) :** जव्हार शहरात शिवजयंती उत्सव हा जव्हार नगरपरिषद, शिवजयंती उत्सव समिती तसेच शहरातील अनेक भागात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी ठिकठिकाणी निरनिराळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्वत्र रयतेचा राजा शिव छत्रपती यांच्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमले होते. तर सर्वच रस्ते भगवे होऊन एक प्रसन्न वातावरण अनुभवण्यास आले

. शिवजयंती उत्सव समीतीचे सभापती पारस राठोड यांच्या हस्ते आनंद दिघे चौकात सकाळी १० वाजता महाराजांना दुग्धाभिषेक घालण्यात आला. त्यानंतर भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण पालघर लोकसभा खासदार डॉ.हेमंत सवरा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विक्रमगड विधानसभा आमदार हरीचंद्र भोये हे देखील उपस्थित होते. यावेळी धर्मवीर आनंद दिघे चौकात शिवव्याख्याते कृष्णा मुरमे यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या पुढच्या टप्प्यात दुपारी १ वाजता शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक अशा शिरपामाळ येथे पालघर लोकसभा खासदार डॉ.हेमंत सवरा, विक्रमगड विधानसभा आमदार हरीचंद्र भोये व उत्सवाचे सभापती पारस राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

उपसभापती चिन्मय राठोड, सचिव अंकुश सहाने, पत्रकार चित्रांगण घोलप, कुणाल उदावंत, निलेश घोलप यांच्या हस्ते महाराजांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले.

यावेळी सर्वच कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य आणि जव्हार नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित शिवभक्त यांच्या हस्ते शिव पुतळ्याचे पुजन व अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिरपामाळयेथून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. शहरात यशवंत नगर, डॉ.आंबेडकर पथ, मुकणे कॉलणी, तारपा चौक या ठिकाणी देखील शिव प्रतिमेच्या पुजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संध्याकाळी ५ वाजता शहरातील यशवंत नगर येथून शिवप्रतिमेच्या मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. दरम्यान बालक, बालिका व महिलांनी देखील मोठ्या प्रमाणावर पारंपारिक पोशाख परिधान करून सहभाग घेतला होता.